# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

आय.डी.एस. इमारत, सेट गेस्ट
हाउसशेजारी आयुका रस्ता,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
दूरध्वनी 02025622385/6/7

डॉ. वैभव जाधव
संचालक
(अतिरिक्त कार्यभार)

जा.क्र./मु.अ.प्र./२१-२२/१४९२

दिनांक : १७.१२.२०२१

## द्वितीय वर्ष एम.कॉम. प्रवेश सूचना
## (शैक्षणिक सत्र २०२१-२२)

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेअंतर्गत शैक्षणिक सत्र २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र २०२१-२२ साठी द्वितीय वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल. तसेच शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सत्र २०२०-२१ मध्ये द्वितीय वर्षास प्रवेश घेतलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक सत्र २०२१-२२ साठी द्वितीय वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल. सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने दि. ३१/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी https://sppuoa.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर **"मुक्त अध्ययन प्रशाळेच्या जुन्या विद्यार्थांसाठी पुढील वर्गात प्रवेश घेण्याकरीता अर्ज"** या विभागाअंतर्गत लॉगिन करून प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरावे. लॉगिन करण्यासाठी PRN आणि yymmdd या स्वरुपात जन्मदिनांक वापरावे. प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर प्रवेश अर्ज व शुल्क पावतीची **प्रिंट घेऊन जपून ठेवावी**. सदर प्रिंट अभ्यास केंद्रावर जमा करण्याची आवश्यकता नाही.

विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये A/B/C/D/E/F/G/H यापैकी जो विषय गट निवडला असेल तोच विषय गट द्वितीय वर्ष एम. कॉम. या वर्गामध्ये प्रवेशासाठी निवडता येईल. सदर विषय गट बदलता येणार नाही.

ज्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत दूरस्थ अध्ययन पद्धतीने प्रथम वर्ष एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेला आहे, असेच विद्यार्थी दूरस्थ अध्ययन पद्धतीने द्वितीय वर्ष एम.कॉम. वर्गामध्ये प्रवेशास पात्र राहतील.

17/12

संचालक
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा